**श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कॉलेज ऑफ नर्सिंग, बार्शी, जि. सोलापूर येथील बी. एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ५० एवढी ठेवण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,**
शासन निर्णय क्रमांक : एनयुआर - १००९/प्र.क्र.७८/०९/शिक्षण-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- ०१ नोव्हेंबर, २०११

**वाचा:-** १) समक्रमांकीत शासन निर्णय, दिनांक १४.०९.२००९.
२) सचिव, भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र एफ. क्र. १८-१९/२५१५-आयएनसी, दिनांक ०५.०७.२०१०

<u>प्रस्तावना</u>:- श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कॉलेज ऑफ नर्सिंग, बार्शी, जि. सोलापूर या संस्थेस बी.एस्सी.(नर्सिंग) अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता सन २००९-१० या शैक्षणिक वर्षी ३० वरुन ५० इतकी वाढविण्यास तसेच ५० एवढे प्रवेश करण्यास संदर्भ क्र.(१) अन्वये मान्यता देण्यात आली होती. सदर संस्थेस संदर्भ क्र.(२) अन्वये भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१०-११ करीता व पुढील निरीक्षण होईपर्यंतच्या कालावधीसाठी बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ५० एवढी ठेवण्यास मान्यता दिली आहे. भारतीय परिचर्या परिषदेने दिलेल्या मंजुरीनुसार या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१०-११ करीता व पुढील निरीक्षण होईपर्यंतच्या कालावधीसाठी बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ५० एवढी ठेवण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>:- भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी उपरोक्त संदर्भ क्र. (२) अन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन शासन याद्वारे श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कॉलेज ऑफ नर्सिंग, बार्शी, जि. सोलापूर या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१०-११ करीता व पुढील निरीक्षण होईपर्यंतच्या कालावधीसाठी बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ५० एवढी ठेवण्यास खालील अटीं व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देत आहे:-

**<u>अटी व शर्ती</u>:-**

१) या महाविद्यालयातील बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता भारतीय परिचर्या परिषदेने निर्धारित केल्यानुसार ५० एवढी राहील.
२) राज्य शासन / केंद्र शासन / मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपद्धत अवलंबिण्यात यावी.
३) शासकीय नियम/कायदा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.
४) केंद्र शासन, भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी नर्सिंग अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.


M. CON 6/12

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७) शासकीय नर्सिंग तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नये.

९) भारतीय परिचर्या परिषदेने दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१०-११ करीता व पुढील निरीक्षण होईपर्यंतच्या कालावधीसाठी असल्याने संस्थेने पुढील विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी भारतीय परिचर्या परिषदेच्या तसेच त्या आधारे राज्य शासनाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

१०) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई यांच्याकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या फी शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समितीकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३. सदर आदेश भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भीत दि. ०५.०७.२०१० च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(वि.ला.ढोले)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
प्राचार्य, श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कॉलेज ऑफ नर्सिंग, जगदाळे मामा हॉस्पीटल आवार, कर्मवीर नगर कॅम्पस, शिवाजी नगर, बार्शी, जि. सोलापूर ४१३ ४११.
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती / शिक्षण शुल्क समिती, २०५, गव्हर्नमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू.) मुंबई-५१.
मा.मंत्री (वै.शि.)/ मा.राज्यमंत्री (वै.शि.)यांचे स्वीय सहायक
निवडनस्ती (शिक्षण-२)